# तळवडे दुर्घटनेतील मृतांची संख्या ११

## जखमींपैकी एका मुलीसह दोघींचा गुरुवारी मृत्यू झाला

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** तळवडे येथील केकवर लावायच्या शोभेच्या फटाक्याच्या मेणबत्ती कंपनीतील स्फोटातील जखमींपैकी एका मुलीसह दोघींचा गुरुवारी मृत्यू झाला. त्यामुळे मृतांची संख्या ११ झाली आहे. प्रियंका यादव (वय ३२) यांचे रात्री पावणे दोन वाजता तर अपेक्षा तोरणे (वय १८) यांचे सकाळी साडे सहा वाजता ससून रुग्णालयामध्ये उपचारादरम्यान निधन झाले आहे. तळवडे तेथील मेणबत्ती कंपनीत आठ डिसेंबर रोजी घडलेल्या आग दुर्घटनेत सहा महिलांचा घटनास्थळी मृत्यू झाला होता. तर दहा जण जखमी



झाले होते. जखमींना पुढील उपचारांसाठी तातडीने पुणे येथील ससून रुग्णालयात पाठविण्यात आले होते. त्यातील प्रतिक्षा तोरणे (वय १६) आणि कविता राठोड (वय ४५) यांचे नऊ डिसेंबर रोजी तर शिल्पा राठोड (वय ३१) यांचे दहा डिसेंबर रोजी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. तर, उर्वरीत जखमींपैकी गुरुवारी दोन महिलांचे उपचारादरम्यान निधन झाले आहे. त्यामुळे तळवडे आग दुर्घटनेतील आतापर्यंतच्या मृतांची संख्या ११ इतकी झाली आहे. या घटनेतील जखमी रुग्ण उषा पाडवी, सुमन गोंधळे, कोमल चौरे, रेणुका ताथोड आणि शरद सुतार यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या रुग्णांच्या प्रकृतीविषयी आयुक्त शेखर सिंह विशेष लक्ष ठेवून आहेत. तसेच वेळोवेळी या रुग्णांच्या प्रकृतीबद्दल माहिती घेत आहेत. उपचारासाठी दाखल असलेल्या तळवडे आग दुर्घटनेतील जखमी रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक मदतीसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने ससून रुग्णालयामध्ये मदत कक्ष सुरु करण्यात आला आहे. यामध्ये वैद्यकीय अधिकारी आणि दोन मदतनीस यांची चोवीस नेमणूक करण्यात आली आहे. तळवडे येथील केकवर लावायच्या शोभेच्या फटाक्याच्या (स्पार्कल कँडल) मेणबत्ती कंपनीतील स्फोटातील जखमींपैकी एका मुलीसह दोघींचा गुरुवारी मृत्यू झाला. त्यामुळे मृतांची संख्या ११ झाली आहे. प्रियंका यादव (वय ३२) यांचे रात्री पावणे दोन वाजता तर अपेक्षा तोरणे (वय १८) यांचे सकाळी साडे सहा वाजता ससून रुग्णालयामध्ये उपचारादरम्यान निधन झाले आहे. तळवडे तेथील मेणबत्ती कंपनीत आठ डिसेंबर रोजी घडलेल्या आग दुर्घटनेत सहा महिलांचा घटनास्थळी मृत्यू झाला होता. तर दहा जण जखमी झाले होते. जखमींना पुढील उपचारासाठी तातडीने पुणे येथील ससून रुग्णालयात पाठविण्यात आले होते. त्यातील प्रतिक्षा तोरणे (वय १६) आणि कविता राठोड (वय ४५) यांचे नऊ डिसेंबर रोजी तर शिल्पा राठोड (वय ३१) यांचे दहा डिसेंबर रोजी ससून रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले.

# वंशाला दिवा नाही, दुसऱ्या लग्नाचा विचार

## पत्नीने दिली पतीची सुपारी जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवडमध्ये वंशाचा दिवा म्हणजे मुलगा होत नसल्याने दुसऱ्या विवाहाचा विचार करणाऱ्या पतीची पत्नीने सुपारी देऊन जीव घेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. घटने प्रकरणी पत्नी रत्ना मिठाईलाल बरुड, शिवम दुबे आणि अमन पुजारी अशी हल्लीखोरांची नावं आहेत. निगडी पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. रत्नाने पतीला जीवे ठार मारण्यासाठी शेजारीच राहत असलेल्या शिवम आणि अमन यांना पाच लाखांची सुपारी दिली होती. अखेर या तिघांचा भांडाफोड पोलिसांनी केला असून त्यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. सविस्तर माहिती अशी की, आरोपी रत्ना आणि मिठाईलाल बरुड हे दाम्पत्य पिंपरी- चिंचवड शहरातील आकुर्डी परिसरात राहतं. या दांपत्याला एकूण आठ मुली असून पैकी एका मुलीचा मृत्यू काही महिन्यांपूर्वी झाला. मिठाईलालला सात मुली असल्याने मुलाची अपेक्षा होती, त्याला वंशाचा दिवा हवा होता. या कारणावरून तो पत्नी रत्नाचा मानसिक आणि शारीरिक छळ नेहमी करायचा. काही दिवसांपासून मिठाईलालच्या मनात वंशाचा दिवा हवा असल्याने दुसरा विवाह करण्यासंबंधी विचार येत असायचा. याची माहिती पत्नी रत्नाला मिळाली आणि





रत्नाने पती मिठाईलालची हत्या करण्याचं ठरवलं. नोव्हेंबर महिन्यापासून रत्ना पतीला मारण्यासाठी प्लॅन तयार करत होती. अखेर शेजारीच राहत असलेले सराईत गुन्हेगार शिवम दुबे आणि अमन पुजारी या दोघांना पाच लाखांची सुपारी दिली. ॲडव्हान्स म्हणून दोन लाख रुपये तीस नोव्हेंबर रोजी रत्नाने अमन पुजारीकडे दिले. काही दिवस उलटून गेल्यानंतर गुरुवारी सात डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास पत्नी रत्ना शतपावली करण्यासाठी घराबाहेर पडली. तेव्हा, तिने अमन पुजारी ला फोन करून पती आतील बेडरूम मध्ये झोपला असल्याची माहिती दिली. रत्नाने आधीच घरातील टीव्ही जवळ धारदार कोयता आणून ठेवला होता, तर रत्नाने दिलेल्या पैशातून अमन पुजारीने चाकू विकत घेतला होता. अमन आणि शिवम थेट घरात शिरले आणि त्यांनी बेसावध असलेल्या मिठाईलालवर सपासप तब्बल २० ते २१ वार केले. पाठीतून पोटात चाकुने भोकसले, चेहऱ्यावर, हातावर वार केले. घरात मुली असल्याने मुलींनी हा सर्व थरार बघून आरडाओरडा केला. घाबरलेले शिवम आणि अमन त्या ठिकाणाहून पसार झाले. गंभीर असलेल्या मिठाईला तातडीने मुलींनी इतर नातेवाईकांच्या आणि शेजाऱ्यांच्या मदतीने रुग्णालयात दाखल केलं. मारेकऱ्यांना रत्नाच्या मुलीने पाहिलं होतं त्यामुळे पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर तिने स्पष्ट त्यांची नावे घेतली. काही तासांमध्येच दोघांनाही निगडी पोलिसांनी अटक केली. आधी मिठाईलाल याच्यावर जीवघेणा हल्ला का? केला याबाबत बोलण्यास आरोपी तयार नव्हते. मात्र, पोलिसांनी खाक्या दाखवताच त्यांनी रत्नानेच पती मिठाईलाल ला जीवे ठार मारण्याची सुपारी दिल्याचे समोर आलं. दुसरं लग्न आणि सात मुली असल्याने होत असलेल्या शारीरिक आणि मानसिक छळातून सुपारी दिल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी रत्ना मिठाईलाल बरुड, अमन पुजारी आणि शिवम दुबे या तिघांना अटक करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नाथा केकान हे करत आहेत.

# पुण्यात ६९ व्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवास सुरुवात!

## पुण्यातील संगीतप्रेमी यांची अखेर प्रतीक्षा संपली

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुण्यातील संगीतप्रेमी यांची अखेर प्रतीक्षा संपली आहे. पुणेकरांचा (ड्ढुरळ ऋरपवहरऑंर चरहेंौरीं झींपश २०२३) आणि त्यातच संगीतप्रेमींचा सगळ्यात आवडत्या महोत्सवाची आजपासून सुरुवात झाली आहे. परंपरेनुसार तुकाराम दैठणकर यांच्या सनई वादनाने ६९ व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची सुरुवात झाली. त्यांनी राग मधुवंतीने सुरुवात केली आणि 'वैष्णव जन तो' या भजनाच्या वादनाने त्यांनी सांगता केली. यानंतर किराणा घराण्याचे गायक संजय गरूड यांनी गायनाची सुरुवात राग भीमपलास मधील 'अब तो बडी देर' या रचनेतून केली. त्याला जोडून द्रुत त्रितालात 'बीरज मे धूम मचाए शाम' ही प्रसिद्ध बंदिश त्यांनी रंगवली. 'माझे माहेर पंढरी' या प्रसिद्ध




अभंगाने त्यांनी भक्तिरसपूर्ण भाव निर्माण केले. 'सवाई' च्या स्वरमंचावर सुविख्यात गायक पं. कुमार गंधर्व यांना जन्मशताब्दीनिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. कुमार गंधर्व यांच्या कन्या आणि शिष्या कलापिनी कोमकली यांनी आपल्या बहारदार सादरीकरणातून कुमारजींच्या समृद्ध आणि प्रयोगशील गायन वारशाचे दर्शन घडवले. आर्य संगीत प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणारा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव मागील ६९ वर्षांपासून आयोजित करण्यात येतो. अनेक वर्ष दिग्गज कलाकारांनी हा मंच गाजवला आहे. यावर्षी १३ ते १७ डिसेंबर २०२३ दरम्यान हा दैदीप्यमान सोहळा संपन्न होणार आहे. मुकुंदनगरमधील महाराष्ट्रीय मंडळ क्रीडासंकुलात हा महोत्सव होत आहे. शहराच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये अग्रमानांकित असलेल्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवासाठी पीएमपीकडून जादा गाड्यांची सुविधा देण्यात आली आहे. ही विशेष सुविधा बुधवार(१३ डिसेंबर) ते रविवार (१७ डिसेंबर) या कालावधीत असणार आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच अन्य शहरातूनही असंख्य रसिक महोत्सवासाठी उपस्थित रहात असतात. सवाई गंधर्व संगीत महोत्सव संपल्यानंतर परतीच्या सोयीसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी २५ टक्के जादा दराने तिकिट आकारणी करण्यात येणार आहे. मुकुंदनगर ते निगडी, मुकुंदनगर ते धायरी, मुकुंदनगर ते कोथरूड डेपो, मुकुंदनगर ते वारजे माळवाडी या मार्गांवर जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. या सर्व गाड्या रात्री साडेदहा वाजता सुटणार असून शनिवारी (१६ डिसेंबर) रात्री साडेदहा आणि रात्री साडेबारा वाजताही जादा गाड्यांची सुविधा असणार आहे. मुकुंदनगर ते निगडीसाठी प्रती प्रवासी ४० रुपये, मुकुंदनगर ते धायरीसाठी प्रती प्रवासी २५ रुपये, मुकुंदनगर ते कोथरूड डेपोसाठी प्रती प्रवासी २० रुपये आणि मुकुंदनगर ते वारजे माळवाडीसाठी प्रती प्रवासी २५ रुपये अशी तिकिट आकारणी करण्यात येणार आहे, अशी माहिती पीएमपीच्या वाहतूक व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.

# केंद्रीय पथकाकडून आजपासून मराठवाडा दौरा

## उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्याचाही दौरा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील निर्माण झालेल्या दुष्काळ पाहणीसाठी केंद्रीय पथक महाराष्ट्रात दाखल झाले आहे. केंद्रीय कृषी मंत्रालयाचे १२ सदस्यांचे पथक राज्यातील दुष्काळ व खरीप नुकसानीचा आढावा घेण्यासाठी मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्याचा आजपासून दोन दिवसीय दौरा करणार आहे. ज्यात मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जालना, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांत हा पाहणी दौरा केला जाणार आहे. तर, दुसऱ्या दिवशी म्हणजेच १४ डिसेंबर रोजी पुणे व सोलापूर, नाशिक, नंदूरबार व जळगावमध्ये हे पथक दुष्काळ पाहणी करणार आहेत. केंद्रीय कृषी मंत्रालयाचे १२ सदस्यांचे पथक मराठवाड्यात दाखल झाले असून, आज आणि उद्या मराठवाड्यातील चार जिल्ह्यात त्यांच्याकडून



दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील काही तालुके व गावांमध्ये जाऊन हे पथक पाहणी करणार आहे. छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सावंगी, तुळजापूर, चौका, मोरहिरा, खामखेडा, डोणवाडी, तर सोयगाव तालुक्यातील जंगल तांडा, फर्दापूर, धनवट या ११ गावांचा यात समावेश आहे. केंद्राचे तीन सदस्यीय पथक आजपासून धाराशिव दौऱ्यावर येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंगळवारी दिली. शासनाने धाराशिव, वाशी व लोहारा तालुके तसेच अन्य तालुक्यातील २७मंडळे दुष्काळी घोषित केली आहेत. या अनुषंगाने दुष्काळाची पाहणी करण्यासाठी केंद्राचे एक त्रिसदस्यीय पथक आज धाराशिव जिल्हा दौऱ्यावर येत आहे. हे पथक धाराशिव तालुक्यातील ताकविकी, करजखेडा, लोहारा तालुक्यातील मार्डी, लोहारा बु, माळेगाव, धानुरी, तावशीगड येथे पाहणी करुन धाराशिवला परतणार आहे. येथे जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेऊन नंतर वाशी तालुक्यातील बोरी, वाशी, विजोरा व लोणखस शिवारात पाहणी करेल.